Regd No.: F-3273(Chandrapur) | Affiliated to MUHS Nashik
INDUTAI GAIKWAD-PATIL
COLLEGE OF PHYSIOTHERAPY
College Code: 6239
MUHS Code: 165105
Dhuti, Near Dongargaon, Wardha Road (NH-44), Nagpur. | Mob: 97637 11372 | Email: igpcop@gpgit.com

Reference No : IGPCOP/PRIN/367/2026

दिनांक : ०७ सप्टेंबर, २०२६

## सार्वजनिक सूचना
## प्रवेश प्रक्रिया – शैक्षणिक वर्ष २०२६–२७

सर्व उमेदवार व पालकांना सूचित करण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२६–२७** करिता महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया संबंधित **शासकीय / विद्यापीठाच्या नियम व विनियमांनुसार** राबविण्यात येत आहे. प्रवेश घेण्यापूर्वी सर्व उमेदवार व पालकांनी खालील सूचना काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करावे.

1. प्रवेशाच्या वेळी **आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे तसेच त्यांच्या छायांकित प्रती** आणणे अनिवार्य आहे.
2. प्रवेश अर्जामध्ये उमेदवाराने नमूद केलेली सर्व माहिती **अचूक, सत्य व संबंधित कागदपत्रांनुसार** असणे आवश्यक आहे. कोणतीही माहिती चुकीची किंवा खोटी आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
3. **MAHACET CAP Round द्वारे उमेदवाराची निवड झाल्याने प्रवेश निश्चित झालेला आहे, असे समजले जाणार नाही.** आवश्यक सर्व कागदपत्रांची पडताळणी व विहित पात्रता निकषांची पूर्तता झाल्यानंतरच प्रवेश निश्चित केला जाईल.
4. प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतीही शंका किंवा अडचण असल्यास उमेदवारांनी किंवा पालकांनी **थेट व अधिकृतरीत्या महाविद्यालयाच्या प्रवेश विभागाशी संपर्क साधावा.**
5. **Institutional Round तसेच Management Quota** अंतर्गत होणारे प्रवेशदेखील संबंधित **शासकीय / विद्यापीठाच्या नियम व विनियमांनुसारच** काटेकोरपणे राबविण्यात येतील.
6. **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रामध्ये**, प्रमाणपत्र क्रमांक, नाव किंवा इतर कोणत्याही तपशीलामध्ये तफावत आढळल्यास, संबंधित उमेदवाराने **संबंधित जात पडताळणी विभागाकडून अधिकृत दुरुस्ती प्रमाणपत्र / Corrigendum** प्राप्त करून ते सादर करणे आवश्यक राहील.
7. कोणतीही **दुय्यम / डुप्लिकेट कागदपत्रे** सादर केली असल्यास, मूळ कागदपत्र हरवल्याबाबतचा **पोलीस FIR तसेच प्रतिज्ञापत्र (Affidavit)** सादर करणे अनिवार्य राहील.

INDUTAI GAIKWAD-PATIL COLLEGE OF PHYSIOTHERAPY SEAL



GAIKWAD-PATIL GROUP OF INSTITUTIONS | Physiotherapy | BAMS | B.Tech | B.Arch | M.Tech | MBA | MCA | BBA | BCA | Polytechnic | B.Pharm | D.Pharm | B.Sc Nursing | GNM Nursing | Ph.D

8. उमेदवाराच्या **नावामध्ये, जन्मतारखेमध्ये, जातीत किंवा इतर कोणत्याही महत्त्वाच्या तपशीलामध्ये** शैक्षणिक अथवा आवश्यक कागदपत्रांमध्ये तफावत / चूक असल्यास, प्रवेश घेण्यापूर्वी ती दुरुस्त करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित अधिकृत विभागाकडून प्राप्त केलेले **दुरुस्ती प्रमाणपत्र** / **Corrigendum** सादर करणे आवश्यक राहील.

9. प्रवेशाच्या वेळी लागू असलेले **शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क** संबंधित **शासकीय / विद्यापीठाच्या नियम व विनियमांनुसार** अदा करणे आवश्यक आहे.

10. प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासन देणाऱ्या **अनधिकृत व्यक्तींवर विश्वास ठेवू नये तसेच अशा व्यक्तींना कोणतेही पैसे देऊ नयेत.** अशा कोणत्याही व्यक्तीची माहिती महाविद्यालयाच्या निदर्शनास आल्यास, संबंधित व्यक्तीविरुद्ध **पोलीस तक्रार व आवश्यक कायदेशीर कारवाई** करण्यात येईल.

11. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी **प्रत्येक विद्यार्थ्यासोबत केवळ एक पालक / पालकप्रतिनिधी (Guardian)** यांनाच महाविद्यालयाच्या परिसरात प्रवेश दिला जाईल. संबंधित पालक / पालकप्रतिनिधीने **वैध ओळखपत्र (Identity Proof)** सोबत आणणे आवश्यक आहे. सुरक्षा व प्रशासकीय कारणास्तव महाविद्यालय प्रशासनास सदर ओळखपत्राची **पडताळणी करण्याचा पूर्ण अधिकार** राहील.

12. प्रवेश प्रक्रियेसाठी **कोणत्याही Admission Agent, मध्यस्थ किंवा इतर कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस महाविद्यालयाच्या परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.** उमेदवारासोबत येणाऱ्या पालक / पालकप्रतिनिधीशिवाय इतर कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस प्रवेश दिला जाणार नाही. सर्व उमेदवार व पालकांनी या सूचनेची विशेष नोंद घ्यावी.

13. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सर्व आवश्यक **मूळ कागदपत्रे, छायांकित प्रती, पावत्या, अर्ज तसेच महाविद्यालयाकडून प्राप्त होणारे अधिकृत पत्रव्यवहार / सूचना** सुरक्षितपणे जतन करून ठेवाव्यात.

14. **प्रवेश घेणारे सर्व उमेदवार तसेच त्यांचे पालक / पालकप्रतिनिधी यांनी वरील सर्व नियम व सूचनांची काळजीपूर्वक नोंद घेऊन त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.**

15. **महाविद्यालय प्रशासनाचा निर्णय तसेच लागू असलेल्या शासकीय / विद्यापीठाच्या नियम व विनियमांनुसार घेतलेला कोणताही निर्णय हा अंतिम व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील.**

INDUTAI GAIKWAD - PATIL COLLEGE OF PHYSIOTHERAPY ★ SEAL

**प्राचार्य**
**इंदुताई गायकवाड-पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, नागपूर**

PRINCIPAL
INDUTAI GAIKWAD - PATIL
COLLEGE OF PHYSIOTHERAPY
DHUTI, NAGPUR